**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra (India)
NAAC – Re-accredited "A" Grade
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
C.O.E. :- (0240) 2403200
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE : www.bamu.net
: http://bamua.digitaluniversity.ac.
E-mail : coe@bamu.net

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)**
**नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त**
Office of the Controller of Examinations
**कार्यालय, परीक्षा नियंत्रक**

संदर्भ: परीक्षा/समन्वय कक्ष/२०१६/ 4661 दिनांक: ०७/१०/२०१६

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय:- परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका सुरक्षीतपणे Download करुन घेण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करणे व इतर सुविधा असणे बाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या (आक्टोंबर-२०१६) परीक्षा अनुक्रमे दिनांक ०४/१०/२०१६ पासुन सुरु झालेल्या आहेत व २०/१०/२०१६ पासून पदव्युत्तरच्या परीक्षांना प्रारंभ होत आहे.

सदरील दिनांक ०४/१०/२०१६ पासून सुरु होणाऱ्या परीक्षांची पूर्व तयारीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही विशेषत: Online प्रश्नपत्रिका Download करणेसाठी तसेच सुरक्षीततेच्या व गोपनियतेच्या अनुषंगाने ज्या सुविधा परीक्षा केंद्रावर अत्यंत आवश्यक आहेत, त्या खालील प्रमाणे निर्माण करण्यात याव्यात.

१) एक स्वतंत्र परीक्षा नियंत्रण कक्ष आवश्यक आहे. त्यामध्ये ज्यांना परीक्षेच्या प्रश्नपत्रिका Download करण्याचे, प्रश्नपत्रिका छायांकित करण्याचे, पॉकेटमध्ये परीक्षानिहाय, दालननिहाय करण्याचे काम देण्यात आलेले आहे, त्यांच्याशिवाय या नियंत्रण कक्षामध्ये इतर कर्मचाऱ्यांना प्रवेश निषीद्ध करण्यात यावा.

२) परीक्षा नियंत्रण कक्षामध्ये एक स्वतंत्र संगणक असावा, ज्याला चांगल्या दर्जाचा वेबकॅमेरा (Web camera) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्रश्नपत्रिका कोण, कुठे, किती वाजता Download करत आहे. त्या सर्व कार्याची नोंद विद्यापीठामध्ये होणार आहे.

३) परीक्षा नियंत्रण कक्षामध्ये IP CCTV कॅमेरा असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठामध्ये सर्व कार्याचे सरळ प्रसारण रेकॉर्ड होणार असून विद्यापीठामधून त्यांचे निरीक्षण व नियंत्रण ठेवले जाणार आहे. तसेच CCTV चे सर्व रेकॉर्डीग सुरक्षीत जतन करुन ठेवण्यात यावे.

कृ.मा.प.

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra (India)
NAAC – Re-accredited "A" Grade
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
C.O.E. :- (0240) 2403200
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE : www.bamu.net
: http://bamua.digitaluniversity.ac.
E-mail : coe@bamu.net

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)**
**नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त**
Office of the Controller of Examinations
**कार्यालय, परीक्षा नियंत्रक**




४) संगणकास इंटरनेट कनेक्टीव्हिटी, स्टॅटिक आय.पी. व त्याच बरोबर एक डोंगल (वायरलेस) जास्तीचे असावे.

५) महाविद्यालयाच्या/संस्थेच्या/प्राचार्यांच्या नावे एक साधा हॅण्डसेट ज्यावर फक्त बोलणे व S.M.S. ची सुविधा आहे असा असणे आवश्यक आहे. स्मार्ट फोन नको आहे. महाविद्यालयाच्या नावानेच एक सिमकार्ड घेण्यात यावे. कृपया वैयक्तिक मोबाईल वापरु नये; वापरल्यास आणि काही बेकायदेशीर घडल्यास त्यास आपण सर्वस्वी जबाबदार असाल.

६) परीक्षा नियंत्रण कक्षामध्ये स्मार्ट फोन, पेनड्राईव्ह व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी सक्त मनाई आहे.

७) प्रश्नपत्रिका Download केल्यानंतर त्याच्या किती छायांकीतप्रती करण्यात आल्या त्यापैकी कीती वाटप करण्यात आल्या व किती शील्लक आहेत त्याचे रेकॉर्ड रजिस्टर तयार करुन जतन करुन ठेवण्यात यावे.

८) परीक्षा नियंत्रण कक्षामध्येच झेरॉक्स मशिन (हायस्पीड) आवश्यक आहे. प्रश्नपत्रिका झेरॉक्स केल्या बाबतची Opening व Closing Reading च्या नोंदीचे रजीस्टर ठेवण्यात यावे.

९) परीक्षा काळामध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाल्यावर पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची सुविधा असणे आवश्यक आहे.

१०) प्रश्नपत्रिका पाठवण्यासाठी Mail Id , मोबाईल नंबर वापर करणाऱ्याचे नांव, पदनाम इत्यादी माहिती परीक्षा विभागास कळवणे अत्यंत आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे सर्व सुविधा अत्यंत आवश्यक आहेत. हे अनेक वेळी पत्रांव्दारे कळविण्यात आलेले आहे. परंतु याची नोंद गांभिर्याने घेतलेली दिसुन येत नाही. पुन्हा आपणांस कळविण्यात येते की, उक्त प्रमाणे सुविधा ज्या महाविद्यालयामध्ये नसतील त्यांनी त्वरीत निर्माण करुन घ्याव्यात, ज्यांच्याकडे या सुविधा अगोदरच आहेत, त्यांनी त्यांची देखभाल करुन परीक्षेसाठी तयार ठेवाव्यात.

ज्या महाविद्यालयामध्ये या सुविधा ठेवल्या जाणार नाहीत त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा इतर जवळच्या महाविद्यालयामध्ये घेण्यात येतील व ज्या महाविद्यालयात परीक्षा घेतल्या जातील त्या महाविद्यालयास परीक्षेवर होणारा सर्व खर्च आपल्या महाविद्यालयाकडून वसूल केला जाईल.

सबब, उक्त बाबतची नोंद घेऊन कार्यवाही करुन विद्यापीठास अहवाल तयार करुन कळविण्यात यावे व परीक्षा सुरळीत पाडण्यासाठी व त्याचे पावित्र्य जपण्यासाठी सहकार्य करावे, ही विनंती .

आपला

7/10/16

परीक्षा नियंत्रक